जा.क्र. मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 662 /२०२३
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण
कक्ष क्र. ५१८, चौथा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पुर्व), मुंबई ४०००५१
दि. 11/07/2023

# दक्षता विभागाचे परिपत्रक - २

विषय- म्हाडा अंतर्गत होणा-या कामांसाठीच्या निविदा सूचना बाबत म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

म्हाडाअंतर्गत विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रात विविध प्रकारची स्थापत्य व विद्युत कामे हाती घेतली जातात. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार रु.१०.० लक्ष पेक्षा जास्त किंमतींच्या कामांसाठी ई-निवीदा मागविणे अनिवार्य आहे व रु.१०.०० लक्षपेक्षा कमी किंमतीच्या कामांसाठी सर्वसाधारण निविदा [Manual Tender] मागविल्या जातात.

जेव्हा सर्वसाधारण निविदा मागविल्या जातात त्यावेळी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्याची व नोटीस बोर्डवर निविदा सूचना लावण्याची पद्धत आहे.

परंतू असे निदर्शनास आले आहे की कंत्राटदारांना सदर निविदा सुचनेची माहिती वेळेवर मिळत नाही. त्यामुळे कंत्राटदारांकडून तक्रारी प्राप्त होतात.

यास्तव या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रत्येक कामाची (रु. १० लक्ष पेक्षा कमी रकमेची तसेच रु. १० लक्ष पेक्षा जास्त रकमेची) निविदा सूचना ही म्हाडाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ/ मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कोंकण मंडळ/नाशिक मंडळ/पुणे मंडळ/अमरावती मंडळ / नागपूर मंडळ/ औरंगाबाद मंडळ

प्रत,
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना माहीतीसाठी सादर
उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा यांना माहीतीसाठी सादर.